# डिजिटल, विनात्रास मोटर विम्यासाठी फ्लिपकार्टची बजाज अलायन्झसोबत हातमिळवणी

- खासगी मालकीच्या चार-चाकी व दुचाकी गाड्यांसाठी मोटर विमा
- सुलभरित्या ऑनलाइन खरेदी आणि जलद दाव्यासाठी साहय, २४ बाय ७ रोडसाइड असिस्टन्स, मोटर ऑन द स्पॉट, दाव्यांच्या पूर्ततेसाठी स्वसर्वेक्षण, नो क्लेम बोनसचे हस्तांतरण (एनसीबी) आणि झिरो डेप्रिसिएशन कव्हर आदी लाभांचा समावेश

**बंगळुरू, २० मे २०२०** : संपूर्णत: भारतात विकसित झालेली ई-कॉमर्स बाजारपेठ असलेली फ्लिपकार्ट आणि भारतातील सर्वसाधारण विमा क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेली बजाज अलायन्झ फ्लिपकार्टच्या ग्राहकांना डिजिटल मोटर विमा देण्यासाठी एकत्र आल्या आहेत. सध्याच्या लॉकडाउनच्या काळात वाहनधारकांना सातत्याने त्यांच्या वाहनांचे आरोग्य आणि त्यांच्या कार्यक्षमतेची चिंता सतावत आहे. खासगी मालकीच्या चारचाकी आणि दुचाकी वाहनधारकांसाठी असलेल्या बजाज अलायन्झ मोटर विमा पॉलिसीमुळे वाहनधारक काळजीमुक्त होऊन त्यांना मन:शांती मिळेल. ग्राहक फ्लिपकार्ट ॲपवरून या विम्याची खरेदी करू शकतात.

मोटर विम्याचे लाभ खालीलप्रमाणे आहेत :

| चारचाकी | दुचाकी |
|---|---|
| **मोटर ओटीएस (मोटर ऑन द स्पॉट)** : मोटर ओटीएसमुळे ग्राहकांना अपघातप्रसंगी गाडीचे स्वसर्वेक्षण करणे शक्य होते | **तात्काळ मदत** : २४ तास साहय आणि एसएमएस, टोल-फ्री क्रमांक, व्हॉट्स ॲप सेवा, मिस्ड कॉल सुविधा, चॅट बॉट बोइंग यांच्या माध्यमातून ग्राहकांच्या प्रश्नांचे त्वरित निराकरण |
| **शून्य डेप्रिसिएशन** : विमा योजनेअंतर्गत डेप्रिसिएशन खर्चापासून संरक्षण देण्यात आल्यामुळे दाव्याच्या प्रतिपूर्तीत ग्राहकांना स्वत:च्या खिशातून करावा लागणारा खर्च कमी होतो आणि बचतीत वाढ होते | **विनासायास नूतनीकरण** : सर्वेक्षणाची गरज नाही, कुठलेही प्रश्न न विचारता केवळ प्रीमिअमची रक्कम भरून विम्याचे विनासायास नूतनीकरण |
| **४०००हून अधिक गॅरेजची यंत्रणा** : देशभरातील | **नो-क्लेम बोनसचे हस्तांतरण** : एनसीबी हे |

| | |
|---|---|
| गॅरेजच्या यंत्रणेतील कुठल्याही पसंतीच्या गॅरेजमध्ये उच्च गुणवत्तेची सेवा आणि कॅशलेस (विनारोख) दावा प्रतिपूर्ती | आगळेवेगळे वैशिष्ट्य असून ग्राहकांना दावा न केलेल्या प्रत्येक वर्षासाठी बक्षिसरुपात लाभ मिळतो. ग्राहकांना विमा कंपनी बदलायची असल्यास ५० टक्क्यांपर्यंत एनसीबीचे हस्तांतरण करण्याची सुविधा |
| **२४ बाय ७ रोडसाइड असिस्टन्स :** प्रवासादरम्यान मदतीची आवश्यकता असलेल्या विमाधारकांसाठी देशभरातील संरक्षण पर्याय | - |

या नव्या सेवेबाबत **फ्लिपकार्टच्या फिनटेक आणि पेमेंट समूहाचे प्रमुख रणजीत बोयानपल्ली** म्हणाले, *“ग्राहकांपर्यंत मूल्याधारित उत्पादने व सेवा घेऊन येणे हेच आमचे सदैव उद्दिष्ट असून त्यामुळे गरजेनुसार आम्ही कल्पक संशोधन करून त्यानुसार विकसित होत आहोत. भारतीय ग्राहकांच्या गरजांची आम्हाला कल्पना असून त्यामुळे गेल्या काही महिन्यांमध्ये आम्ही आयुर्विमा, आरोग्य आणि उपकरणांशी निगडित विविध विमा सेवा उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. ग्राहक आमच्या व्यासपीठाचा अधिकाधिक वापर करत असताना त्यांना विशेषत: सध्याच्या कसोटीच्या काळात त्यांच्यासाठी हितकारक असतील अशी उत्पादने व सेवा आम्ही उपलब्ध करून देत आहोत. मोटर विमा सेवेमुळे ग्राहकांना आपल्या वाहनांच्या सुरक्षिततेसाठी विनाअडथळा आणि लवचिक असे विमा उत्पादन उपलब्ध होईल. ग्राहक-केंद्री सोल्युशन्स उपलब्ध करून देण्याच्या आमच्या ध्येयाशी मेळ खाणाऱ्या बजाज अलायन्झ या कंपनीसमवेतच्या भागिदारीमुळे आमच्या व्यासपीठावर विमा क्षेत्रातील सर्वोत्तम असे विमा उत्पादन उपलब्ध होईल. ग्राहकांपर्यंत विनाअडथळा सेवेचा लाभ पोचवण्यासाठी या भागिदारीचा उपयोग होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो.”*

या संदर्भात **बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तपन सिंघल** म्हणाले, *“ग्राहकांसाठी प्रत्येक ठिकाणी उपलब्ध राहाणे आणि त्यांना त्यांच्या गरजेनुसार सुयोग्य विमा सेवा पुरवणे यावर आमचा विश्वास आहे. फ्लिपकार्टवर आम्ही देत असलेल्या मोबाइल विम्याव्यतिरिक्त आता या व्यासपीठाच्या माध्यमातून मोटर विमा उपलब्ध करून देऊन ही भागिदारी आणखी पुढे घेऊन जाताना आम्हाला आनंद होत आहे. यामुळे नव्या युगातील या व्यासपीठावरील आमचा वितरणाचा पाया विस्तारण्यास तर आम्हाला मदत होईलच, शिवाय फ्लिपकार्टच्या ग्राहकांना सुयोग्य सोल्युशन्सच्या माध्यमातून श्रेणीतील सर्वोत्तम अशा सेवा पुरवणेही आम्हाला शक्य होईल.”*

गेल्या काही दशकांमध्ये भारतात विमा उद्योगाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. विविध प्रकारची उत्पादने आणि योजना यांमुळे ग्राहकांना आर्थिक संरक्षण देण्याबरोबरच देशाच्या अर्थव्यवस्थेतही या क्षेत्राने भर घातली आहे. आपल्या ग्राहकांसाठी कल्पक आणि समयोचित वस्तू व सेवा घेऊन येण्याच्या प्रवासात फ्लिपकार्टने विमा क्षेत्राच्या या विस्तारात योगदान दिले आहे. भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजांनुरुप त्यांना व्यक्तिगत आणि सुलभ विमा योजना उपलब्ध करून देण्यासाठी सध्या फ्लिपकार्ट विमा क्षेत्रातील काही आघाडीच्या विमा कंपन्यांसमवेत काम करत आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more details contact: media@flipkart.com**

**About Bajaj Allianz General Insurance**

Bajaj Allianz General Insurance is India's leading private general insurance company. Bajaj Allianz is a joint venture between Bajaj Finserv Limited, India's most diversified non-bank financial institution and Allianz SE, the world's leading insurer and largest asset manager. Bajaj Allianz General Insurance offers general insurance products such as motor insurance, home insurance, health insurance as well as other unique insurance plans such as wedding insurance, event insurance, and film insurance. The Company began its operations in 2001 and today has a pan-India presence in over 1500 towns and cities. The Company has been constantly expanding its operations to be close to their customers. Bajaj Allianz General Insurance has been a profit-making company since its inception and has consistently been rated with "iAAA" rating for its claims paying ability by ICRA Limited (an associate of Moody's Investors) consecutively for the last 13 years.

**For any queries, please contact:**

**Bajaj Allianz General Insurance:**

- Nikhil Bharadwaj: +91 9975592317 | nikhil.bharadwaj@bajajallianz.co.in
- Aarti Somaiya: +91 9323742377 | aarti.somaiya@bajajallianz.co.in
- Richa Gaikwad: +91 98196 84265 | richa.gaikwad@bajajallianz.co.in